आधार भिम झाला

गायक/ गितकार

विजय काशिद

विनिमय प्रकाशन

मुंबई

आधार भिम झाला

: प्रकाशक :
विनिमय प्रकाशन
राजरत्न ठोसर
उदयनगर, सूर्यनगर पोलीस स्टेशनच्या बाजूला,
एल. बी. एस मार्ग, विक्रोळी (प), मुंबई - ४०० ०८३.
संपर्क : ९९६९१९८८२१.

प्रथमावृत्ती : ६ डिसेंबर २००८
(डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन)

: मुद्रक :
क्रोमा ग्राफिक्स
अजित कडवेकर
मो. ९३२४०९६००६

: मुखपृष्ठ :
कुंदन ठोसर

: अक्षर जुळवणी :
विनिमय प्रकाशन

किंमत : २०/-

आनंद शिंदे
(पोपट फेम, सिने पार्श्वगायक)
२५४ / २०२२ मंतीलाल नगर क्रमांक -१, गोरेगाव (प.), मुंबई -४०० १०४ • दूरध्वनी : २८८३२११९, २८७१०८७८ • मोबाईल : ९८९२३०४०१९

शाहू, फुले, आंबेडकरी चळवळीचे मार्ग अनेक आहेत. त्या पैकी प्रभावशाली माध्यम म्हणजेच गीत, गायन, लेखन होय. या चळवळीचे महाकवी दि. वामनदादा कर्डक, लक्ष्मणदादा केदार आणि या चळवळीचा सूर म्हणजेच माझे वडील स्वर सम्राट दि. प्रल्हाद (दादा) शिंदे. अशा महानायकांच्या सहवासात राहून व त्यांची प्रेरणा घेऊन गीत गायनाच्या माध्यमातून भीम क्रांतीचं निळं वादळ निर्माण करणारे, आपल्या काव्यलेखनातून विद्रोह मांडणारे नवतरूण तडफदार गायक आणि गीतकार माझे (भाचे) आयु. विजय काशिद यांची अनेक गीतं मी स्वत: गाईली आहेत. उदा. विद्येचा राजा या कॅसेटमध्ये "नातं बुद्धाशी जोडलं", कायदा भिमाचामध्ये "काळजात बुद्ध कोरला" अशी अनेक गीतं पुष्कळ गायकांनी गायली आहेत.

तरी त्यांच्या आधार भीम झाला या पहिल्या काव्य पुष्पाला माझ्या मनपूर्वक हार्दिक सुभेच्छा! त्यांनी अशीच गीत गायनाच्या माध्यमातून प्रबोधन करावे हीच सदिच्छा व क्रांतीकारी जयभीम!

आपला धम्मबंधू
गायक : आनंद शिंदे

7.11.08

☎ : 28672626
✆ : 9819074224

एकांतीनम हिम्मत, स्वरा साधना, कल्याण रत्न

पुरस्कृत

स्वरसाधना पुरस्कृत स्वरांजली

गायक : मिलिंद शिंदे

छत्रपती शिवाजी राजे कॉम्प्लेक्स, म्हाडा कॉम्प्लेक्स, स्वामी समर्थ सोसायटी, बिल्डिंग नं. ४०/३०६, कांदीवली (प.), मुंबई-४०० ०६७.

कवीवर्य व गीतकार आयुष्यमान विजय काशिनाथ काशिद हे उत्कृष्ठ गायक व गीतकार आहेत. भीम बुद्धांची असंख्य गाणी त्यांनी लिहिली आहेत व गाईली आहेत. त्याचं गीत मी स्वत: गाईले आहे. उदा. "विद्येचा राजा" या कॅसेटमधील गीत मनुवाद्याला रं जातीवाद्याला रं व आत्ताच ६ डिसेंबर निमित्त येणारे कॅसेट सिडीज "कायदा भीमाचा" या मध्ये गीत मानवतेचा शिल्पकार हे गीत गाईले आहे. त्यांची लेखणी सुबक व इतिहासकारक आहे. त्यांची पहिली आवृत्ती आधार भीम झाला प्रकाशित होत आहे. या काव्यगीत पुष्पाला हार्दिक सुभेच्छा व क्रांतीकारक जयभीम!

त्यांनी असाच काव्य माध्यमातून व गीत गायनातून भीम बुद्धाचा प्रसार करावा हि सदिच्छा!

आपला धम्मबंधू
गायक : मिलींद शिंदे

बुध्द, फुले, शाहू, आंबेडकरी विचाराचा बुलंद आवाज | विश्वाला विचार दान प्रेम

प्रभाकर पोखरीकर

रेडीओ, टीव्ही., कॅसेटकोंग, प्रबोधनकार, गितकार,संगीतकार व लोकप्रिय गायक

अमर महल, पंतनगर नं. ३, नागसेन विहार, एम जी. रोड, घाटकोपर, मुंबई : ४७

कवी, आयु. विजय काशिनाथ काशिद याच्या काव्यसंग्रहास मनापासून सुभेच्छा देताना आनंद होत आहे. बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर विचार विश्वातील मानवतेला सन्मार्ग दाखवत आहे. ते काम अनेक माध्यमातून देशामधून होत आहे. १९५६ साली डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या धर्मांतरापासून खऱ्या अर्थाने बुद्धाचा विचार घराघरात माणसामाणसात पोहचविण्याचे काम भीमशाहीर कलावंतांनी केले. त्यांचा वारसा देखील अनेक कलाकारांनी जतन करण्याचे महान कार्य कलाकारांनी आपल्या कलेच्याद्वारे केले.

तरूण कवी विजय यांना ५/६ वर्षापासून ओळखत असून लहानपणापासून बाबासाहेबांची महापुरूषाच्या विचाराची काव्य रचना ते लिहीत आहे. महाकवी लक्ष्मणदादा केदार, महाकवी वामनदादा कर्डक यांचा सहवास त्यांना लाभला म्हणून गाणं लिहिण्याचा छंद जडला. सहाजिकच आहे त्यांची गाणी गाऊन, त्यांची गाणी पाहून त्यांच्यात कवी जागा झाला. आज विजय देखील चांगल्या पद्धतीची गाणी लिहू लागलेले आहेत. त्यांच्या गाण्याचा हा संग्रह आधार भीम झाला प्रकाशित होत आहे. त्यांना व त्यांच्या सहकार्यांना मनपूर्वक धन्यवाद! या कार्यातही त्यांना यश मिळो, प्रगती होवो हिच सदिच्छा!

आपला धम्मबंधू

कवी: प्रभाकर पोखरीकर

दामोदर शिरवाळे

कवी

प्रभात अपार्टमेंट, ई.-१, २९, वी-१०, सेक्टर-८, नेरूळ, नवी मुंबई - ४०० ७०६.

भ्रमणध्वनी : ९८६९३३७२३५

"आधार भीम झाला" काव्यसंग्रहानिमित्त

बहुतेक स्त्री-पुरूषांच्या अंगी सुप्त गुण असतात. त्याला वाव कसा मिळेल हे मात्र सांगता येत नाही. मग ते गुण अभिनयाचे, गायन कलेचे, काव्य लेखनाचे, गीत लेखनाचे, नृत्याचे क्रिडा या विविध खेळांचे किंवा कसरतीचे असोत. ती व्यक्ती आपोआपच त्या कलेकडे आकर्षित होऊन त्या त्या कलेत प्रशिक्षणाने निपूण होते.

कवी गायक विजय काशिद हे कलावंत हे लहानपणापासून गीत लेखनाचा व गायनाचा छंद जोपासणारे आहेत. विजय यांची गाणी लिहिण्याची हातोटी चांगली असून गायिकी पण चांगली आहे. त्यांच्या बोलण्यात व वागण्यात नम्रता आहे. त्यांचा विजय नक्कीच होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराशी व तथागत भ. बुद्धांच्या तत्वाशी बांधिलकी असलेल्या कवीगायकाच्या "आधार भीम झाला" काव्य संग्रहास सुभेच्छा!

आपला धम्मबंधू

कवी: दामोदर शिरवाळे



कवीचे मनोगत

विचाराचा लाव्हा सळसळतो.... आणि त्याला ज्वालामुखीचे स्वरूप येते. त्यातच.... त्या ज्वालामुखीचा उद्रेक होतो आणि त्याच विचारांच्या ज्वालामुखीतून शब्दाचा अंगार विद्रोही काव्याच्या रूपाने बाहेर पडतो. त्याच पद्धतीने माझ्या काव्याचा जन्म झाला आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतीमय जीवन.... तथागत भगवान बुद्धांची तत्वप्रणाली शांतीचा संदेश.... समाजातील होणारे अन्याय, अत्याचार.... बहुजनांचे दु:ख, यातना, छळ, पिळवणूक आणि आजचे ढोंगी राजकारण व त्यातून होणारी समाजाची दिशाभूल अशा विविध सत्य प्रसंगाचा कल्लोळ माझ्या काव्यात उमटलेला दिसतो. दि. महाकवी वामनदादा कर्डक आणि लोककवी लक्ष्मणदादा केदार व स्वरसम्राट दि. प्रल्हाददादा शिंदे यांच्या सहवासातून मला गाण्याची व लिहिण्याची प्रेरणा मिळाली हे माझे भाग्यच आहे.

माझे वडिल दि. काशिनाथ लिंबाजी काशीद यांच्या प्रोत्साहानाने व क्रांतीकारी विचारांनी माझ्या गीतांना व काव्यांना जणू क्रांतीचे अकुंरच फुटले. माझी पुष्कळ गाणी माझ्या स्वत:च्या आवाजात ध्वनीमुद्रीत झाली आहेत आणि लोकांच्या मनात रूजली आहेत व त्यापैकी माझी पुष्कळशी गाणी नामवंत गायकांनीही गायली आहेत. उदा. आद. आनंद शिंदे, मिलींद शिंदे, मैना कोकाटे, जगदीश गोरसे, अनंत मोरे, समीर शेरला, सचिन मोरे, शालिनी शिंदे, तृप्ती चव्हाण, अरविंद मोहिते, दिनेश हेलाडे, राहूल भोसले आणि अशोक निकाळजे अशा अनेक कलावंतांच्या आवाजात माझी गाणी ध्वनीमुद्रीत झालेली आहेत.

मला आज येथपर्यंत पोहचविणारे माझे मोठे बंधु आयु. मनोज काशिद, हरीश काशिद आणि माझ्या मातोश्री आयु. सुमनबाई काशीद यांचा यात सिंहाचा वाटा आहे. वेळोवेळी मला निस्वार्थीपणाने सहकार्य करणारे माझे सस्नेही धम्मबंधु आयु. संदिप गायकवाड, महेंद्र साळुंखे, तृत्यदिग्दर्शक राहूल गवई, जीवन सोनावणे, आणि माझे कवीवर्य चंद्रकांत चंदनशिवे, माझे मामा कवीकर्य महादेव चव्हाण व कवी-गायक आमचे दादा रघुनाथ पडवळ या सर्वांचे मला मोलाचे सहकार्य मिळाले. माझ्या जीवनातले "आधार भिम झाला" हे पहिले काव्यपुष्प आपणास सुपुर्त करीत आहे. या पुढेही समाज प्रबोधनाची क्रांतीमय चळवळ माझ्या काव्यगीतातून तसेच गायनातून समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोचवीत राहील.

कवी/गायक

विजय काशीद

प्रकाशकीय

प्रबोधन म्हणजेच मार्गदर्शन किंवा गाणे म्हणजेच प्रचार. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ तळगाळातील लोकांपर्यंत कोणी पोहचविली असेल तर कवींनी, शाहिरांनी आणि गायकांनी. चळवळ लोकांपर्यंत पोहचविण्याचे मुख्य केंद्र म्हणजेच गीत-गायन. गीत गायनातून जितक्या लवकर चळवळ वाढवू शकतो तसे इतर माध्यमातून वाढवू शकत नाही. बाबासाहेबांच्या वेळी गीत गायनच हे चळवळीचं मुख्य केंद्र होतं असं म्हटलं तरी अतिशयोक्ती होणार नाही असे वाटते. अठराविश्वे दारिद्र्य असलेल्या माणसाला देखील बाबासाहेब गायनाच्या माध्यमातून समजत होते.

माझी दहा भाषणे तर कवीचं एक गाणं अशा शब्दात बाबासाहेबांनी कवींचा गौरव केला. स्वत: च्या भाषणाबरोबर बाबासाहेबांनी कवींची केलेली तुलना यातून बाबाचं मोठेपण दिसून येतं. म्हणूनच तर वामनदादा म्हणतात, "चांदण्याची छाया, कापराची काया। माऊलीची माया होता, माझा भिमराया।. कवींनी बाबासाहेबांची चळवळ देशाच्या कानाकोपऱ्यात नेली आणि आजही नेत आहेत.

बाबासाहेब म्हणतात, "माझ्या मित्रांना व सहवासातल्या मंडळींनासुद्धा वाटते की माझा स्वभाव काव्यमय नाही. मी देखील असेच समजतो. पण माझा स्वभाव अगर वृत्ती काव्यमय नसल्या तरी माझा आयुष्यक्रम माझे जीवन म्हणजे एक अपूर्व व प्रचंड असे काव्यच बनत चालले नाही काय? एका अस्पृश्याचे, महाराचे पोर पुढे राउंड टेबल परिषदेत बसेल आणि राष्ट्राची भवितव्यता निर्माण करणाऱ्या घटनेत प्रामुख्याने भाग घेईल हे कोणाला तरी शक्य वाटते काय? कल्पनेची भरारी लुळी पडावी, कल्पनेलाही आकलन करता येऊ नये इतकी ही घटना काव्यमय व चमत्कृती नाही का? ज्याला काव्य उर्फ रोमान्स म्हणतात त्यात माझ्या या आयुष्यक्रमापेक्षा अभूतपुर्व असे अधिकोत्तर तरी काय असू शकणार?"

माझे मित्र विजय काशिद यांचा कवीता संग्रह प्रकाशित करताना खुप आनंद होत आहे. नेहमीप्रमाणेच वाचक या काव्यसंग्रहाचा इतर पुस्तकांप्रमाणेच स्वागत करतील अशी आशा वाटते.

राजरत्न ठोसर

आधार भिम झाला

कॅसेट : आधार भीम झाला गायक : अरविंद मोहिते

आधार भीम झाला, आमचा उद्धार भीम झाला
कोटी कोटी दलितांचा, एक सरदार भीम झाला
चांद हा पुनवचा, झाला भयान काळ्या राती
मनामनात चेतवली, भिमरायानं ज्ञानाची ज्योती
जो तो जोमानं स्वाभिमानानं, जयभीम बोलाया लागला ।।धृ।।

पाहूनी त्या अन्यायाला, क्रांतीने मनी पेटत गेला
जागं झाला आग झाला, झाला ज्वालामुखी
क्रांतीच्या त्या रणमैदानी, झुंज देण्या वीर मर्दानी
महाडकाठी हक्कासाठी, जनता घेऊन दु:खी
चवदार पाणी आधी प्याला भीमा
भटबामनाची नाही केली तमा
भाला ना बर्ची नाही, तलवार घेतली हाती
जातीवाद्याला दिली, भीमानं रं मूठमाती ।।१।।

कुंकवाची राखा लाज, वाचवा हो कुंकू माझं
कस्तुरबाचे बोल ऐसे, पडता कानावरी
कस्तुरबाचा ठेऊनी मान, विचार केला भिमरायानं
वाचविले गांधीजीला, एका सहीवरी
जीवाचं दान असं केलं इथे, पुणे करार असा झाल इथे
जोडीले त्याने मनामनाशी, नवीन नाती
तुडवूनी साऱ्या पायाखाली, त्या जातीपाती ।।२।।

रक्तहीन ती केली क्रांती, द्वेषाला त्या दडवून अंती

नाशिकच्या त्या मंदिराचे, द्वार केले खुले
जाळूनी त्या दुष्ट मनूला, समतेचा हा पाया रचीला
सारे सारे मुक्त केले, संविधानामुळे
मानसन्मान आज, आम्हा मिळे
माणसाशी माणसाचे, नाते जुळे
दिन दुबळी जनता, आज सुखात सारी न्हाती
समते ममतेनं आज, घेऊनीया हात हाती ।।३।।

भारताचा भीम सरताज, गांजल्यांचा भीम आवाज
शोषीतांचा पिडीतांचा, भीम वाली खरा
विश्व सारं देतयं ग्वाही, भीमावाणी कोणी नाही
भारताचा डोई साजे, भीम कोहीनूर हिरा
बुद्धाच्या धम्माला, गेला शरण
पंचशिला वदला, त्रिशरण
दिक्षाभूवरती त्या, नागांच्या नागपुराला
विजयाच्या संग रंग आला, त्या हर्ष स्वराला ।।४।।

भीमजयंती

कॅसेट : आधार भीम झाला गायक : अशोक निकाळजे

आले आले आले सारे, जयभीमवाले
निळ्या निळ्या रंगात, निळे निळे झाले
ढोल ताशा वाजे, तरा रा रा रा
भीमजयंती दिनी ।।धृ।।

बुद्ध विहारत कोणी, बुद्धा गाथा गाई
बुद्ध वंदनेचा सुर, घुमे ठाई ठाई
दाही दिशामध्ये पहा हीच ती नवलाई
मंगल दिनाची वाजे, गोड शहनाई ।।१।।

समाधानी समाजाची, आज ही दिवाळी
आनंदूनी गेल्या साऱ्या, माया लेकी बाळी
गोड धोड जेवणाला, पुरणाची पोळी

दारापुढं नक्षीदार, सुबक रांगोळी ।।२।।

सानथोर लेकरांनी, केली पहा दाटी
जयभीम बोलूनीया, घेती गाठी भेटी
भीमाची ही मुलं, सारी सारी स्वाभिमानाची
थाटामाटामधी करी, उत्सव जोमानी ।।३।।

निळा झेंडा पहा, कसा डोले गगनात
निळ्या आकाशाशी, जणू जोडू पाहेनात
हर्ष मनोजाही न्हाला, निळ्या पावसात
विजयाच्या गाण्याची, होता बरसात ।।४।।

भिमसेना

जयभिमवाले आम्ही दिवाने
निळीच आमुची शान
दिल्लीवरती लावूनी दावू
आम्ही निळं निशाण!
रक्तामध्ये भीम आमुच्या, निळाच आमुचा बाणा
भीमरायाची सेना सारी, भीमसेना भीमसेना ।।धृ।।

शौर्य आणि धैर्याचे आम्ही धडे रोज गिरवितो
ज्ञान बळाने बड्या बड्या त्या वैऱ्याला हरवितो
जातीवादी सैतानांची मस्ती ही जिरवितो
जिथे थांबले फिरणारे ते धम्मचक्र फिरवितो
लोकांसाठी सदैव राहील लोकशाहीच घटना ।।१।।
जोवरती या जीवात आहे जीव जीवाला देवू
बुद्धमय हा देश बनविण्या प्राण पणाला लावू
मानवतेच्या हक्कासाठी रक्त भले ही वाहू
माणुसकीच्या कल्याणाचे गीत मुखाने गाऊ
इतिहास हा देई ग्वाही मागे कधी सरलेना ।।२।।

अन्यायाची सीमा चुकूनी पार कुणी जरी केली
सांगा आम्हाला टक्कर देण्या माय कुणाची व्याली

एकजुटीनं मिळून जर का भीमसेना ही आली
गाडून टाकू जिवंत त्यांना आम्ही जमिनीखाली
विटंबना पुतळ्याची जर का आता पुन्हा ती झाली
भीमसेनेच्या कानावरती पुन्हा बातमी आली
ज्वालामुखी अन् भीमलव्हाळा पुन्हा उफाळून येईल
कधीच नाही घडले ऐसे चिल एकदा होईल
विचारधारा विजयाची ही तुम्ही मनाशी माना ।।३।।

आधार झाला रे

अंधार सारीला , नवा उजेड पेरीला
कोटीकोटीच्या हृदयावर, धम्म बुद्धाचा कोरीला
सारा ओसाड पडलेला, रान मळा हा हेरीला
अंधरुढीत रूजलेला, सारा समाज तारीला
चांद जणू आला, सवे ज्ञानाचा प्रकाश घेऊन
दिपवली धरणी, हीन दीनांचा विकास होऊन
आधार झाला रे, उद्धार झाला रे
भीमाईचा भीमराया ..... ।।धृ।।

चारवर्णी चौकट होती
जातीवादी फरफट होती
अन्नासाठी पाण्यासाठी
होती वणवण इथे
पाहूनी त्या थैमानाला
जातीवादी वैमानाला
झुंज देण्या हक्का घेण्या
सरसावला तिथे
महाडच्या रणसंग्रामामधी
पहिलाच लढा दिला जोमामधी
स्वाभिमान जाग केला आम्हामधी
चारवर्णाच्या घोर तमामधी
दलितांना केलं खुलं तळ्याचं पाणी प्याया
शिकवील आम्हा वाघापरीच जीणं जगाया ।।१।।

विषवली होती विषमता

लोपलेली होती समता
यातनेची वेदनेची जाण नव्हती कुणा
वेशीवरती होतं ठाणं
पशुतुल्य होतं जीणं
देवाच्या त्या देवळात
जाण्या होती मना
दडवून दु:ख सारं मनामधी
उतरला भीमराव रणामधी
आवसान आलं तनमनामधी
द्वार त्यानं उघाडिलं क्षणामधी
लाविली त्यानं आईपरीच आम्हा माया
अन्यायासंगं दिलं सामर्थ आम्हा लढाया ।।२।।
खोडूनी ते धर्म विधान
लिहिलं सत्य संविधान
भारताला दान केलं
शुभ मंगल दिनी
नागपूरच्या नागभूमीला
दुबळी जनता घेऊन गेला
शुद्ध केलं बुद्ध केलं
धम्म देऊन क्षणी
माणसात माणसाला बसवीलं
बुद्धाचं ज्ञान मनी ठसवीलं
तनमन सारं त्यानं झिजवीलं
विश्वात नाव असं गाजवीलं
विजयाचा हर्ष झाला उन्हामधी जशी छाया
पंचम सुरात गाणं राहुल लागलाय गाया ।।३।।

।। वंदन ।।

गायक : विजय काशिद

तथागताला आणि भिमाला प्रथम स्मरतो मी
दोन्ही कर हे जोडून तयांना वंदन करतो मी ।। धृ।।

क्रांतीत आहे खरी धम्म क्रांती धम्मक्रांतीमध्ये आहे शांती
कार्य मोलाचे सारे भीमाचे ध्यानी ध्यानी धरतो मी ।।१।।

क्रांतीचा लढा भिमाने लढविला समाज नवा भिमाने घडविला
भिम धैर्याचे भिम शौर्याचे स्मरण करतो मी ।।२।।

गेले दिवस सारे दु:खाचे गेले विजया आले दिन सुखाचे आले
आता सुखाचे, सारे हिताचे रंग भरतो मी ।।३।।

।। भीम नामामध्ये ।।

भीम नामामध्ये गुंतले माझे मन
अर्पिले भीम चरणी, आता मी जीवन ।।धृ।।

सूर जगण्यातला, हा मला घावला
तेव्हा सप्तसुरांचे, हे झाले मिलन ।।१।।

भीम विचारामध्ये, भीम आचारामध्ये
भीम शब्दामुळे हे, जुळाले कवन ।।२।।

भीम नामातला, मर्म मी जाणला
भीम नामामध्ये, लाभले ज्ञान धन ।।३।।

गीत विजया तुझे, अंतरात रूजे
हर्ष जीवनात आले, नवे भीम किरण ।।४।।

।। रणवीर भीम ।।

गायक : राहुल भोसले

रणवीर भीम झाला, क्रांतीरणामधी

जिंकिला डाव त्याने, एका क्षणामधी ।।धृ।।

क्रांतीचा वेगळा इथे, संग्राम आखला
चवदार पाणी प्याला, लाखो जनामधी।।१।।

अन्याय पाहूनी झणी, सरसावला पुढे
क्रांतीने पेटला इथे, अंतरमनामधी ।।२।।

वादळ सुसाट होऊनी, फिरला चहू दिशा
येऊनी थांबला तो, बुद्धाच्या वनामधी ।।३।।

हर्षाने गाठले आता, विजयाचे ते शिखर
फुलले शिवार सारे, चैताच्या उन्हामधी ।।४।।

।। भीमानं केलं सोनं ।।

भीमानं केलं कोटी कोटी जीवनाचं सोनं
तुले काय सांगू माय
गुलामाला झाली आज गुलामीची जाण
तुले काय सांगू माय ।।धृ।।

गुराढोरावाणी होतं लाचारिचं जीणं
पोटापाण्यासाठी तवा होती वणवण
गावाच्या बाहेर होतं वेशीवर ठाण ।।१।।

बामणाला होता आमच्या सावलीचा बाट
येण्याजाण्या मना होती गावातली वाट
जीत्यापणी होतं रोज रोजचं मरणं ।।२।।

शिक्षणापासून तवा होतो आम्ही दूर
अज्ञानाचा होता चारी बाजूंनी अंधार
बंदी होती वाचण्याची पोथीन पुराण ।।३।।

भिम पुण्याईन आज मिळे आम्हा मान
विजयापरी ते किती झाले सुज्ञान
हर्ष मनोजाचा झाला जागा स्वाभिमान ।।४।।

।। देवाचा भक्त ।।

तथागताचा आणि भिमाचा
पाईक म्हणवून घेतोय रं
दरवर्षाला फॅमिलीसंगं
देवाच्या वारीला जातोय रं।।धृ।।

घरात याच्या देव्हारा मोठा
नावाला करतोय जयभिम खोटा
आराधी मेळा करूनी गोळा
घरात गोंधळ घालतोय रं।।१।।

समाजामधी सांगतोय बुद्ध
वागतोय बुद्धा विचाराविरूद्ध
देवाच्या पुढं बकरं कोंबडं
नवस म्हणून व्हातोय रं।।२।।

देऊ नका अशा लोकास मान
समाजामधील आहे ही घाण
समाजापुढं ह्यो वरचढ
जातीचं भाषण देतोय रं।।३।।

जयभिमवाला हा मुळीच नाही
विजया त्याची देतोय ग्वाही
मोठ्या जोमानं टाटासुमोन
सोबती लोकांना नेतोय रं ।।४।।

।। सकाळी ।।

गायक : मिलींद शिंदे

सकाळी सकाळी, आली साद कानी
सप्तसूर सुरमधूर, बुद्धभीम वाणी ।।धृ।।

किलबिलाट झाली, पिलापाखरांची
कोकीळ गोड गाते, पंचशिल गाणी ।।१।।

वृक्षपिंपळाचा, बहरूनी आला
दिसे बुद्धप्रतिमा, जणू पानोपाणी ।।२।।
नदी सागराला, जावूनी बोले
दुजा नाही ज्ञानसागर, भिमासम कोणी ।।३।।

झाली प्रभात झाली, भिमभास्कराची
विजयास येऊनी सांगे, जणू संध्याराणी ।।४।।

।। भीम जन्मला ।।

कॅसेट : भीम आमचा तारणहार

"निळ्या नभातूनी ध्वनी जणू निनादला
दिनांचा वाली आला जन्मास आला ऽऽ"
महू गावाला आनंद जाहला
भिमाईच्या पोटी भीम बाळ जन्मला ।।धृ।।

चौदा एप्रिलची ती उजडली पहाट

भीम सूर्य प्रकाशाची पसरली लाट
निळ्या नभामधी निळा तारा चमकला ।।१।।

पिला पाखरांची सारी किलबिलाट झाली
वृक्ष वेली कळ्या फुले फुलूनिया गेली
सुगंध ही पांगला मळा सुगंधला ।।२।।

आनंदाची वार्ता ही जाता ठाई ठाई
निसर्गाने केली पुन्हा नवी नवलाई
इंद्रधनू आकाशी नव्याने रंगला ।।३।।

भिम जन्मताच सुटला सुसाट्याचा वारा
तोच वारा देत सुटला जयभीम नारा
विजयाही हर्षला सुरात बरसला ।।४।।

।। पाखरांनो ।।

कॅसेट : काळजात बुद्ध कोरणारा **गायिका : वैशाली शिंदे**

यारे यारे पाखरांनो घरटे भिमाचे पुन्हा बांधू चला
व्हारे व्हारे एक व्हार एकजुटीने पुन्हा नांदू चला ।।धृ।।

जारे जारे रानोरानी मागे ना राहो आता कोणी
सारे सारे बोलवारे एकीचा रांधा पुन्हा रांधु चला ।।१।।

ऊन वारा पावसाळा गोठून येईल थंड हिवाळा
द्यारे द्यारे साथ द्यारे पांगल्या विचारा पुन्हा सांधु चला ।।२।।

गारे गारे हे तराणे गाऊ नव्याने विजयाचे गाणे
घ्यारे घ्यारे संग घ्यार निष्ठा भिमाची पुन्हा वंदू चला ।।३।।

।। मनूचे सर्प ।।

कॅसेट : मनूचे सर्प गायक : विजय काशिद

ज्ञानाचे तिक्ष्ण भाले, खोचले भिमाने
मनूचे सर्प सारे, ठेचले भिमाने ।।धृ।।

बसलेले लपूनी, साप वारूळात
खोदून एका एका, खेचले भिमाने ।।१।।

विषारी सर्पाचे विषारी दात सारे
मुखासवैच सारे, चेचले भिमाने ।।२।।

वारूळे मनूची, भिमाने खोदली
धर्मांध वारूळांना, जांचले भिमाने ।।३।।

मारीले सर्प सारे, आम्हास दंशणारे
विजयाचे तंत्र सारे, वाचले भिमाने ।।४।।

।। वस्तीत माणसाच्या ।।

गायक : राहूल भोसले

वस्तीत माणसांच्या जीणे कठीण झाले
सुखाचे घास आता खाणे कठीण झाले ।।धृ।।

सुखी कुणीच नाही वस्तीत राहणारा
ते दाखले दु:खाचे देणे कठीण झाले ।।१।।

कुठे खून चोरी तर कुठे मारामारी
श्वास श्वासात येथे घेणे कठीण झाले ।।२।।

माणूस आज झाला वैरी हा माणसाचा
रस्त्यावरून येणे जाणे कठीण झाले ।।३।।

शाहीर कैक झाले विजया तुझ्याप्रमाणे
आता नको नको हे गाणे कठीण झाले ।।४।।

।। उपकार झाले ।।

गायक : राजरत्न भोसले

घातकार झाले, तुझेच तुझ्यावर
मातकार झाले, तुझेच तुझ्यावर ।।धृ।।

तुला काय ठावे, कुणा काय द्यावे
उपकार झाले तुझेच तुझ्यावर ।।१।।

तुला जाणणारे, तुला मानणारे
निंदकार झाले, तुझेच तुझ्यावर ।।२।।

ठेवली कुणीरे, तुझ्याशी इमानी
गद्दार झाले, तुझेच तुझ्यावर ।।३।।
कळाले कसे ना, विजया तुला हे
डोईभार झाले, तुझेच तुझ्यावर ।।४।।

।। सप्तसुरांची मैफील ।।

गायक : राहूल भोसले

सप्तसुरांची मैफील सजवून भीम गेले
धम्माचा सूर हृदयी रूजवून भीम गेले ।।धृ।।

चंद्रमणीसवे त्या वदवून भीमवाणी
नागांची नाग भूमी उजवून भीम गेले ।।१।।

समता नवी भिमाने समतेशी बांधली रे
विषमतेच्या रूढीला रिझवून भीम गेले ।।२।।

जातियतेची दाह मनूने लावलेली
सारी क्रमाक्रमाने विझवून भीम गेले ।।३।।

विजयाचा दिन होता विजयादशमी होती
किर्तीचा डंका येथे वाजवून भीम गेले।।४।।

।। धन्य मी जाहलो ।।

कॅसेट : काळजात बुद्ध कोरणारा गायक : विजय काशिद

धन्य मी जाहलो अरे भीमराया
जन्म हा मिळाला तुझे गुण गाया।।धृ।।

तुझीया मुळेच मिळे मान पान
जाहले माझ्या या जिवनाचे सोने
विश्व हे मिळाले नव्याने बघाया।।१।।

तुच माझे गीत, तुच माझे हित
गातो तुला मी, कवनात नित
तुच आहे माझ्या, कल्पनेची छाया ।।२।।

काळजात माझ्या, तुझे आहे स्थान
गाताना मरावे मी, तुझे गुन गाण
समाजाची सेवा, कराया विजया ।।३।।

।। निर्वाण माझे ।।

गायक : दिनकर शिंदे

वैशाखी पौर्णिमेच्या, शुभ सायंकाळी
निर्वाण व्हावे माझे, अशा रम्य वेळी ।।धृ।।

चैत्यभूमीवरी, सागर किनारी
प्रतिमा भिमाची भासे, त्या क्षितीजापरी
जणू गात सागर लाटा, पंचशील ओळी।।१।।

सळसळ पिंपळाची, पक्षाची गाणी
बुद्ध वंदना ती गाता, करूण स्वरांनी
तशातच मम श्वाशाची, संपावी खेळी ।।२।।

सूर्य बुडताच यावा, चंद्रमा नभात
शितल प्रभा पसरता, अवघ्या जगात
समाधानी विजयाची, आस ही निराळी।।३।।

।। शाहीर अण्णाभाऊ साठे।।

शाहीरीने केला, ज्या क्रांतीचा उठाव
अण्णाभाऊ साठे, त्या शाहिराचं नाव।।धृ।।

शाहिरीत होती, ती क्रांतीची आग
शाहिरीने केली, ती क्रांतीची जाग
शाहिरीने केला, त्या अन्यायावर घाव ।।१।।

नको ही जातपात, नको हा भेदभाव
येथे समानतेने, नांदावे रंकराव
मनी बहुजनांच्या पेरीला सद्‌भाव ।।२।।

माय मराठीचा, जपावा हा बाणा
घराघरामधूनी, जन्मावा शिवराणा
जनजागृतीला, फिरला गावोगाव ।।३।।

संघर्ष नवा ऐसा, केला तयाने येथे
जातीयता विषमता, होती जेथे तेथे
विजया बहुजनांच्या, घेतला मनाचा ठाव ।।४।।

।। लढ्यावर लढे ।।

कॅसेट : काळजात बुद्ध कोरणारा गायक : कमलेश शेजुळे

लढविले भीमरायानी, लढ्यावर लढे
पाडिले जातीयवाद्यांचे, मढ्यावर मढे ।।धृ।।

नीच नाही कुणी, उच नाही कुणी
समसारे इथे, तुच्छ नाही कुणी
फोडिले धर्मपंथाचे, घड्यावर घडे ।।१।।

तोडिले पाश सारे, रूढीचे जुणे
जोडिले कोटी कोटी, मनाशी मने
चिरडीले जातिवादी, किड्यावर किडे ।।२।।

स्वाभिमानी असावे, मनाने इथे
उजळूनी ते दिसावे, गुणाने इथे
हक्कासाठी लढे द्या, बड्यावर बडे ।।३।।

विजय भिमरायाचा, झाला खरा
ताज मानाचा भीमराव, ल्याला खरा
शिकविले दिव्य ज्ञानाचे, धड्यावर धडे ।।४।।

।। भीमानंतर ।।

कॅसेट : काळजात बुद्ध कोरणारा गायक : वैशाली शिंदे

भीमानंतर पडले अंतर, गावागावामधी
वैर चेतले दुहिचे आता, भावाभावामधी ।।धृ।।

चार दिशेला चारीजण, बसले मांडूनी ठाण
इथं नडलयं मोठंपण, मोठेपणात गेलं भान
राजकारण करू लागले, नावानावामधी ।।१।।

भाऊ भावाचा झाला वैरी, शिखराची चढण्या पायरी
नातीजोडून आयरी गैरी, वैऱ्याहून झाले वैरी
एकमेकाला भांडू लागले, तावातावामधी ।।२।।

भीम स्वप्न हे अधूर,कसं होईल आता पुरं
म्हणवीती भीमाचे वीर, सांगा कसले हे बहादूर
खेचू लागले एकमेकाला, डावा डावामधी ।।३।।

रथ समतेचा हा रूढ, कसा जाईल सांगा पुढं
वाट वळणाची अवघड, कोण नेईल क्रांतीकडं
काही कळेना विजयालाही, कावाकावामधी ।।४।।

।। नाते जोडले तथागताचे ।।

गायक : आनंद शिंदे

मडके तुझ्या गळ्यातले, भीमाने फोडले
नाते तथागतासवे, भीमाने जोडले ।।धृ।।

नव्हताच आसरा तुला, नव्हताच मान रे
गावाच्या बाहेर तुझं वेशीत ठाण रे
माणूस म्हणूनी माणसा, भीमाने ओढले।।१।।

मेलेली ढोर ओढणं, होतं तुंझ रे काम
त्या भट ब्राम्हणाघरी, होतास तू गुलाम
बंध गुलामी शृंखले, भीमाने तोडले ।।२।।

डोळे असूनी माणसा, होतास आंधळा
अन्याय साहिलेस तू, होऊनी पांगळा
प्रतिकार करण्या तुला, भीमाने सोडले।।३।।

बुद्धाचा धम्म देऊनी, मुक्ती दिली तुला
लढ्याची झुंजण्याची, शक्ती दिली तुला
विजया सुमार्गाने तुला, भीमाने धाडले ।।४।।

।। कोटीकोटीचा प्रकाश।।

कॅसेट : मनूचे सर्प ठेचले भिमाने गायक : पल्लवी दाभोळकर

कोटीकोटीचा प्रकाश
निळ्या आकाशी लोपला
जल सागराच्या काठी
ज्ञान सागर झोपला ।।धृ।।

भीम मायेची पाझर
होता मायेची पाखर
सांभाळीले कोटी कोटी
जीव लावूनी लेकरं
सहा डिसेंबर दिनी
काळा अंधार व्यापला ।।१।।

भीम मनूचा संहारी
होता खरा क्रांतीकारी
भीमक्रांती वाटेवरी होता
मनूला त्या भारी
त्याच्या पुढं थरथरा
जातीवादी तो कोपला ।।२।।

भीम समतेची छाया
होता ममतेची माया
दीनदलितांकरीता
नित्य झिजविली काया
धम्म कल्याणाचा त्याने
नऊ कोटीला सोपला ।।३।।

भीम करूणेची खाण
होता करूणेचं रान
भीम विजयाचं गाणं
होता नवजीवदान
त्यान बुद्ध तत्वात
सारा समाज गुंफला ।।४।।

।। नाव भिमाचं गं ।।

कॅसेट : भीमानं केलं जगाचं सोनं गायिका : पल्लवी दाभोळकर

नाव भिमाचं गं, नाव बुद्धाचं गं
माझ्या मुखी मी घोळते
लेणं मोलाचं गं, शुद्ध शिलाचं गं
तत्व बुद्धाचं पाळते ।।धृ।।
सासू सासऱ्याचं, दिर ननंदाचं
असं प्रेमाचं माझं नातं
भीम पुण्याईनं, सारं आनंदानं
सुख वैभव माझ्या घरात
येता मनात गं, माझ्या ध्यानात गं
अंधश्रद्धेला टाळते।।१।।

बुद्ध प्रणालीचे, भीम प्रणालीचे
नित करते गं आचरण
पतीरायापरी मी ही ध्यान करी
पंचशीलेचं नित्य स्मरण
अडीनडीला गं, वेळ घडीला गं
सुख दुःखात भाळते ।।२।।

आई वडिलांची, जीवाभावाची
लेक आहे मी, एकुलती एक
बंधू विजयाची, अन् हर्षाची
आहे बहीण शामल नेक
येता आठवणी, मला राहूनी
तरी मनाला जाळते ।।३।।

।। पुढाऱ्यांनो ।।

जनतेच्या जीवांवरती, जगणाऱ्या भिकाऱ्यांनो
द्यारे रे सोडून आता तरी, सोंग सारं टुकाऱ्यांनो।।धृ।।

भोळी जनता पाहूनी, टाकिता तुम्ही डाव
किती लुटता या जनतेला, जनतेच्या लुटाऱ्यांनो ।।१।।

देव धर्माच्या नावाने, लावीता तुम्ही भांडण
जीव घेता निष्पापीचे, जातीच्या पुजाऱ्यांनो ।।२।।

देशद्रोही तुम्ही सारे, निच वैरी तुम्ही सारे
आग लावूनी जाता, विकलेल्या शिकाऱ्यांनो ।।३।।

या तुमच्या करणीने, झाली विजया लाचारी
राजकारण असे करता, माजलेल्या पुढाऱ्यांनो ।।४।।

।। संविधान।।

गायक : दिनेश हेलाडे

भीमाने भारताचे लिहिले संविधान आहे
संविधान मुळेच भारताची शान आहे।।धृ।।

पंडीत नेहरू गांधी राजेंद्र प्रसादांनी
कौतुक केले महामानवाचे सर्वांनी
भीमाच्या विचारात खरे तत्वज्ञान आहे ।।१।।

दोन वर्ष अकरा महिने सतरा दिवसांनी
घटना पूर्णता ही केली भिमरायांनी
घटनापती भीमरायाला हा मान आहे ।।२।।

उच्च निचतेचा ठेवीला ना मतभेद
समानतेचा दिला भीमाने नवा बोध
म्हणूनी सारे आजला इथे समान आहे ।।३।।

दिव्य मंथनाचा भीम झाला सागर
ठरला विश्वामधी ज्ञानीयांचे आगर
विजयापरी हर्ष गातोया गुणगान आहे।।४।।

।। एकी।।

गायक : मिलींद शिंदे

सत्ता ही आमच्या हातात हाय
पण एकीच आमच्या नेत्यात नाय ।।धृ।।

गोंधळ केला नेत्यांनी असा
गोंधळला हा समाज तसा
म्हणून समाज गोत्यात हाय ।।१।।

दारात वैऱ्याच्या जातोय कुणी
सहारा वैऱ्याचा घेतोय कुणी
याचाच फायदा घेतात हाय।।२।।

एकीनं जर का येतील सारे
मत बहुजन देतील सारे
ताकद मोठी मतात हाय ।।३।।

आतातरी खोल विचार करा
विजयाची बोल ध्यानात धरा
सत्यता त्याच्या गीतात हाय।।४।।

।। हत्ती ।।

गायक : विजय काशिद

भीमरायाच्या कार्यपथाला
दिली आम्ही अशी गती रं
विसरून गेलो निशाणी आम्ही
भिमरायाचा हत्ती रं ।।धृ।।

भाऊ भावाशी भांडतो
पाट रक्ताचे सांडतो
निच पणाची आम्हीच केली
आमची आवृत्ती रं ।।१।।

चढलो स्वार्थी अगर
सत्याला ठेवून दूर
ओढून घेतली अंगावरती
नको अशी प्रचीती रं ।।२।।

स्वत: करून घेतली दशा
लोकांची झाली हशा
टिकवून ठेवली आजपर्यंत
आमच्या मनाची मती रं ।।३।।

आता सत्याला ओळखा
खऱ्या कार्याला पारखा
सोडून दे रे विजया आता
मनाची सारी भिती रं ।।४।।

।। नातं बुद्धाशी जोडलं।।

कॅसेट : विद्येचा राजा
गायक : मिलींद शिंदे

मनूवाद्याला रं जातीवाद्याला रं
आधी मातीत गाढलं
नातं बुद्धाशीरं नातं धम्माशीरं
माझ्या भीमानं जोडलं।।धृ।।

नव्हता वाली सालोसाली
या निळ्या नभाच्या खाली
छळीत होत्यान् पीळीत होत्या
मनूनीतीच्या चाली
भिमरायानं रं मोठ्या शौर्यानं रं
जुन्या रूढीला मोडलं ।।१।।

कवडीमोलाचं होतं जीणं
त्या जीण्यात नव्हता मान
पदोपदा होतं दु:ख सदा
जगणं होतं हैराण
क्रमाक्रमानं रं सारं भिमान रं
पाश मनूचं तोडलं।।२।।

डाव मनूचा होता भारी
विषमता होती सारी
चाळून तिला जाळून तिला
समता आणली दारी
घावाघावानं रं डावाडावानं रं
डाव हाणून पाडलं।।३।।

होतो देवाचे आम्ही छंदी
दर्शनाला होती बंदी
मनूवाद्याला रं जातीवाद्याला
जातीची होती धुंदी
हर्ष मनोजाला आणि विजयाला
बुद्ध पथाला धाडलं ।।४।।

।। ज्ञानदीप ।।

धम्माचा ज्ञानदीप, विझणार नाही आता
दगडाचे देव कोणी, पुजणार नाही आता ।।धृ।।

त्रिशरण पंचशिला, यांच्याशिवाय कोणी
भक्तीभजन कुणाचे, भजणार नाही आता ।।१।।

जीवनफुले बहरली, धम्माच्या अंगणात
मनूचे बीज तेथे, रूजणार नाही आता ।।२।।

बुद्धापदी भीमाने, केले विलीन आम्हा
अंधरूढीत कोणी, कुजणार नाही आता।।३।।

फेकिले दूर सारे, अज्ञान बा भिमाने
विजयाच्या डोईवरती, सजणार नाही आता ।।४।।

।। बुद्ध कोरणारा ।।

कॅसेट : काळजात बुद्ध कोरणारा गायक : अरविंद मोहिते

तत्वज्ञान तेथे पेरणारा पाहिला
कोटी कोटी तेथे तारणारा पाहिला
जातीवाद येथे सारणारा पाहिला
मनूवाद येथे मारणारा पाहिला
काळजात बुद्ध कोरणारा पाहिला ।धृ।।

महाडात पहिली ती दिली ललकारी
दलितांची फौज बनविली क्रांतीकारी

मनूचे काळीज चिरणारा पाहिला
तळे महाडचे घेरणारा पाहिला
पाणी दलितांना पाजणारा पाहिला ।।१।।

गुलामाला केली ऐसी गुलामीची जाण
भीमाच्या क्रांतीने येथे पेटविले रान
ज्ञान अज्ञानात ढाळणारा पाहिला
मनूच्या ग्रंथाला जाळणारा पाहिला
तापत्या उन्हात पोळणारा पाहिला
मातीतून सोने गाळणारा पाहिला ।।२।।

लोकशाही नांदते आज ठाई ठाई
हिच आहे माझ्या सारी भिमाची पुण्याई
लक्ष्मणा बुद्ध दावणारा पाहिला
ज्ञानदीप जगी तेवणारा पाहिला
नाव किनाऱ्याला लावणारा पाहिला
किर्ती विजयाची ठेवणारा पाहिला ।।३।।

।। अंकुर ।।

कॅसेट : राखा भीमाचे इमान　　गायक : विजय काशिद

१४ एप्रिल प्रभात झाली
वसुंधरा फूलून आली
चैताच्या उन्हात ऽऽ
कोमेजलेल्या दीनदलितांच्या
अंकुर फुटला मनात ।।धृ।।

अठराशे एक्क्याण्णव साली लाट उसळली हर्षाची
१४ व्या रत्नाने आशा मिटविली वर्षोवर्षाची
भिमाईच्या त्या उदरी आला
महूगावाला आनंद झाला
त्या अवघ्या क्षणात ।।१।।

जातीयतेच्या अंधारात पिळलेली होती जनता

नकोनकोसे जीवन होते गुलामीत होती गणता
भीम सूर्याच्या तेजानेही
झगमगली ज्ञानाची ज्योती
निस्तेज तनात ।।२।।
पिता रामजी आनंदाने सांगे नवलाई सारी
वंश दिप हा सकपाळचा इतिहास करील भारी
"विजया संगे प्रकाश" येथे
गाईल नित्य गौरव गीते
दीन दुबळ्या जनात ।।३।।

।। भीम सैनिक ।।

कॅसेट : भीम आमचा तारणहार गायक : अशोक निकाळजे

तत्व भीमाचे पेराया, रान समतेचं हेराया
भीम सैनिक निघाला पढे, भीम सैनिक.....।।धृ।।

भीमावादी विचाराने, ठाई ठाई प्रचाराने
अंधश्रद्धेला माराया, भीम सैनिक .....।।१।।

खेड्यापाड्यात जाऊनी, भीम संदेश देऊनी
सारे अज्ञान साराया, भीम सैनिक .....।।२।।

बहुजन हा जुडवीत, मनूवाद्याला तुडवीत
भीम तत्वाने तराया, भीम सैनिक ..... ।।३।।

क्रांतीच्या पथावरती, स्वार विजया रथावरती
धम्म बुद्धाचा कोराया, भीमसैनिक ..... ।।४।।

।। भीमराया ।।

चंदनापरी, झिजलास भीमराया
सुगंधापरी, गंधलास भीमराया ।।धृ।।

सागरापरी, उसळलास भीमराया
अमृतापरी, बहरलास भीमराया ।।१।।

निसर्गापरी, मोहरलास भीमराया
वसंतापरी, बहरलास भीमराया ।।२।।

आभाळापरी, गरजलास भीमराया
पावसापरी, बरसलास भीमराया ।।३।।

सूर्यापरी, तापलास भीमराया
चंद्रमापरी, लोपलास भीमराया ।।४।।

।। लोक पाहिले ।।

स्वाभिमान कोणी, जपणारे पाहिले
सत्यासाठी कोणी, खपणारे पाहिले
स्वार्थासाठी कोणी, विकणारे पाहिले
कोणासाठी कोणी, तरणारे पाहिले
भलेभले लोक ते जगणारे पाहिले मरणारे पाहिले।।धृ।।

पाहिल्या त्या उंच उंच, त्या माड्यावरती माड्या
माड्याखाली पाहिल्या, त्या तुटक्या तुटक्या झोपड्या
थाटामाटामधी, राहणारे पाहिले
थाटमाट कोणी, सोडणारे पाहिले
घरटे सुखाचे, मोडणारे पाहिले
नाते गोते कोणी, तोडणारे पाहिले ।।१।।

आयत्या बीळावरती, झाला कुणी नागं
निष्ठावंत येथे कोणी, राहिला तो मागं
शिखरावरती कोणी, चढणारे पाहिले
चढताना कोणी, पडणारे पाहिले
चढण्यासाठी कोणी पाडणारे पाहिले
तिथल्या तिथं कुणी, आडणारे पाहिले।।२।।

कुणी खेळ खेळतोया, आंधळ्याचा येथे
कुणी खेळ मांडलाया, गोंधळ्याचा येथे
वचनाला कोणी, जागणारे पाहिले
सुखवैभवाला, त्यागणारे पाहिले
कुणी कर्म येथे, भोगणारे पाहिले
विजयापरी ते, वागणारे पाहिले।।३।।

।। मरण यावे असे ।।

गायक : विजय काशिद

गाथा भीमरायाची मी गाता गाता
मरण यावे सकाळी सकाळी
बुद्धाची आणि बा भिमाची
आळवीता मुखाने भूपाळी ।।धृ।।

गोड वाणी पडो कानोकानी
आळवीता चिमुकल्या जीवांनी
जुळता जुळता प्रणाली स्वरांची
गोड कंठात व्हावी मव्हाळी ।।१।।

चैत्यभूमीवरी बा भीमाच्या
त्या किनाऱ्यावरी सागराच्या
झुळझुळणाऱ्या मंदमंद लाटा
स्पर्शाव्या जिवांच्या जीव्हाळी ।।२।।

पहिल्या किरणांची तांबूस लाली
कोवळी कोवळी पांगलेली
पाखरांची ती सुमधूर वाणी
व्हावी विजयाची तीच आरोळी ।।३।।

।। काट्यामधून वाट ।।

कॅसेट : क्रांतीच्या मशाली

गायक : सचिन मोरे

काट्यामधून वाट, काढीत भीम गेले
मनूचे पाश सारे, तोडीत भीम गेले ।।धृ।।

जातीयतेचे काटे, वाटेने पांगलेले
जाताना वाट सारी, झाडीत भीम गेले ।।१।।

झाल्या कितीही, जरी यातना जीवाला
दु:ख मनोमनात, गाढीत भीम गेले।।२।।

विजया ही वाट आता, केली खुली भीमाने
आठवण या वाटेवरती, सोडीत भीम गेले ।।३।।

।। शिखर गाठले ।।

कॅसेट : काळजात बुद्ध कोरणारा गायक : दिनेश हेलोडे

भिमरायानी शिखर गाठले
सखोल अभ्यासानी
वदते विश्व सारे
भीमासम नाही कोणी।।धृ।।

दु:खी वनवास होता, दूर प्रवास होता
गरीबी दरिद्रीचा गळ्याला पाश होता
ज्ञान गंगेच्या तीरी जाऊन
प्याला अमृत पाणी ।।१।।

जीर्ण तो कर्दन काळ, होतं जातीचा विटाळ
क्रूर त्या विषमतेचं, होतं विणलेलं जाळं
भिमरायाच्या नवक्रांतीने
टाकिले जाळूनी ।।२।।
नेते गुनवान सारी, होते विद्वान भारी
तयामधूनी भिमाने, मारीली उंच भरारी
भीमवीराने मागे सारिले
बुद्धीवान अन् ज्ञानी ।।३।।

लिहून संविधान, दिलं देशाला दान
साऱ्या नेत्यामधी तो, भिमराव झाला महान
विजयावाणी गाती गाणी
आज इथे हर्षानी ।।४।।

।। ज्ञानाच्या जोरावरी ।।

गायक : बाळू पाडमुख

भिमाने ज्ञानाच्या जोरावरी
क्रांती ही न्यारी केली खरी
इतिहास हा भूवरी ऽऽ
जिंकला लढा असा ज्ञानावरी ।।धृ।।

बार ज्ञानाचा उडविला
त्याने हल्ला असा चढवीला
लढा हक्काचा लढवीला
इतिहास नवा घडवीला
शिक्षित होऊन त्याने प्रथम
बसविला ऐसा ज्ञानाचा जम
मात केली अज्ञानावरी ।।१।।

लेखणीची करून तलवार
तिला लाविली ज्ञानाची धार
वारावरी करूनी वार
अज्ञानाला केलं ठार
गिरवून एक एक सारे धडे
लढ्यावरी लढवीले लढे
नव्या नव्या विज्ञानावरी ।।२।।

कास सत्याची त्याने धरली
तयापुढे विषमता हरली
जात मातीत सारी पुरली
वाट धम्माची ऐसी धरली
घेऊन कोटी कोटी जन

बुद्धापदी अर्पिले मन
ध्यान लाविले ध्यानावरी ।।३।।

भटकर्मठ चातुवर्णी
सारे आणिले त्याने चरणी
अशी भिमाने केली करणी
झाली पावन भारत धरणी
"हर्ष मनोजापरी" इथे
"विजया" गाई गौरवगीते
तान देऊनी तानावरी ।।४।।

।। भीम कार्याचा ध्यास ।।

कॅसेट : छाती ठोकून जयभीम बोला गायक : विजय काशिद

भीम कार्याचा ध्यास मनाला, लावून घेर आधी
नंतर जयभीम घाल गड्या तू, साऱ्या समाजामधी ।।धृ।।

उगाच टेंभा मिरवू नको रे, खोट्या गुणाचा इथं
शुद्ध शिलाचं आचरण कर तू, जीवनात या नित्य
सल्ला हिताचा ऐक तेव्हा, मिळेल नवीन गती ।।१।।

भीमरायाचा सैनिक हो तू, निष्ठावंत पाईक
भीम तत्वाने शिकून हो तू, पुढाऱ्यांच्या लाईक
वाट अगोदर भीमरायाची, धर तू वेढ्या शिदी ।।२।।

खरं बोलता मनाला लागे, विजयाचं बोलणं
नाही बरं हे हरीशभाऊ, तुझं असं वागणं
कशी रं वाहील खळखळणारी, ही समतेची नदी ।।३।।

।। रस्ते रस्ते झाडा ।।

कॅसेट : काळजात बुद्ध कोरणारा गायक : सचिन साठे
रस्ते तस्ते झाडा, फुलांची नक्षी काढा

येणार आंबेडकर, सभा बाबांची होणार ।।धृ।।

साऱ्या जमल्या आया बाया
दर्शन बाबाचं घ्याया, भीमरायाला पहाया ।।१।।

चांदीचं इमाइन, त्याला सोन्याचं कुलूप
या दलित लोकासाठी, बाबा हिंडतो मुलूक ।।२।।

धम्माचं हे ज्ञान, पेरूनी रानोरान
पेरून रानोरान, केलं मानवतेचं सोनं ।।३।।

विजयाचं गाणं, इथं गाते आनंदान
भीमरायाच्या गाण्यामधी, गेलं हरपून भान ।।४।।

।। जळत्या घराकडे ।।

गायक : विजय काशिद

जळत्या घराकडे त्या, जाता तुम्ही कशाला
गद्दार स्वार्थापाई, होता तुम्ही कशाला ।।धृ।।
विसरले का आता, ते बोल भीमबाचे
वैऱ्याचा हात हाती, घेता तुम्ही कशाला ।।१।।

समता तशीच आहे, समतेशी बांधलेली
विषमतेला मुभा त्या, देता तुम्ही कशाला ।।२।।

बसवून भीम गेला, मानाच्या पंगतीला
वैऱ्याच्या पंक्तीचे, खाता तुम्ही कशाला ।।३।।

विजया ही अंध झाला, धनाच्या गफलतीने
गाणे उगाच त्याचे, गाता तुम्ही कशाला ।।४।।

।। ज्ञानाच्या रणसंग्रामी ।।

कॅसेट : भीम साऱ्यांना पुरून उरला गायक : अशोक निकाळजे

ज्ञानाच्या त्या रणसंग्रामी
कधीच नाही हरला
साऱ्या बापांचा बाप ठरला हो
भीम साऱ्यांना पुरून उरला ।।धृ।।

वाट क्रांतीची आखूनी
राहिला रणी ठाकूनी
चवदार तळ्याचं पाणी
हिनदीना सेवे चाखूनी ।।१।।

पुण्यामधला पुणे करार
होती गांधीची उपासमार
देऊनी बुद्धीला जोर
सोडवला सारा प्रकार
भीमरायाच्या एका सहीनं, गांधीजी तरला ।।२।।
काळ्या देवाच्या देवालयात
नव्हता प्रवेश जाण्या आत
येत होती ती आडवी जात
त्याच जातीचा केला घात
जातीवादी तो मनूवादी, मातीमधी पुरला ।।३।।

दिक्षाभूमीवरती त्या भीमानं
कोटी कोटी घेऊन जन
बुद्धापदी अर्पिलं मन
कोटी जीवाचं केलं सोनं

विजया कंठी अशोका ओठी सूर नवा भरला ।।४।।

।। राखा भीमाचे ईमान ।।

कॅसेट : राखा भीमाचे ईमान गायक : विजय काशिद

भिमाने दिला रे तुम्हा माणसात मान
करू नका रे तुम्ही त्याचा अपमान
राखा भीमाचे ईमान ..... ।।धृ।।

रक्ताचे पाणी केले भीमाने
जीवन बाग ही फुलविली मोठ्या श्रमाने
भीमरायाच्या नवक्रांतीने
जीवन जगता हे स्वाभिमानाने
कार्य दाखवा तयाच्या प्रेरणे समान ।।१।।

स्वार्थापाठी धाऊ नको रे
गुलामीच्या बंधनात राहू नको रे
अन्याय आता साहू नको रे
अत्याचार दुरूनच पाहू नको रे
हक्कासाठी लढा नका बसू गुमान ।।२।।

झिजला ऐसा लाजले चंदन
करी विश्व आज तया हर्षाने वंदन
विषमतेचे केले कंदन
साक्ष देई विजयाचे ज्ञानेशा स्पंदन
वाट विकासाची दाविली गतीमान ।।३।।

।। धम्मदिक्षा घ्यायला ।।

कॅसेट : भीम शक्तीचा दरारा गायक : विजय काशिद

दिक्षाभूमीला चल जाऊ मंगला
जोडीनं जाऊया धम्म दिक्षा घ्यायला ।। धृ।।

नागपूरच्या गाडीला गर्दी लई दाट
दिक्षाभूमी सोहळ्याचा पहायला थाट
भिम बुद्धाचरणी फुलं वाहायला ।।१।।

भिमामुळे धम्माची वाट ही मिळाली
जीर्ण रुढी परंपरा दूर ती पळाली
जीवनाची नौका, सार्थकी न्यायला ।।२।।

त्रिसरण पंचशिल आचरणात ठेवू
पाईक भीमाचे खरे प्रसारक होऊ
बुद्ध भीम ज्ञानाचं अमृत प्यायला ।।३।।

नागभूमीवरी ऐकू विजयाचं गाणं
भीम विचाराचं तिथं लुटूया गं सोनं
संगतीला घेऊ हर्ष गाणं गायला ।।४।।

।। भीम क्रांतीचा आवाज ।।

कॅसेट : भीम धमाका गायक : अशोक निकाळजे

भीम क्रांतीचा आवाज उठवा
एकीनं हा समाज नटवा
वसा घ्या रं भीमकार्याचा
करू खातमा जातीवादी वैऱ्यांचा ।।धृ।।

सारं आमचं असून आम्ही
का करावी सांगा गुलामी
आता देवूया दाखवूनी
नाही कुणाला आम्ही कमी
गटबाजीचे बंधन तोडा
भीम कार्याशी तनमन जोडा
थारा नको त्या गैऱ्यांचा ।।१।।

भीमशक्ती बळकट करू
गटातटाला बाजूला सारू
निळं निशाण हाती धरू
सत्याची चळवळ करू
जातीवादी त्या पुढाऱ्यांचा
रंग बदलणाऱ्या सरड्यांचा
भाव ओळखा चेहऱ्यांचा ।।२।।

बहुजनाला संगं घेऊ
बळ एकीचं आता दावू
मागे नका रे कुणीच राहू
नका अन्याय कोणी साहू
हर्षासंगं उत्कर्षाचा
जिंकू किल्ला तो विजयाचा
लढा लढूया शौर्याचा ।।३।।

।। भिमाचा बाणा ठेवा ।।

कॅसेट : भीमाचा बाणा गायक : विजय काशिद

भिमाचा बाणा ठेवा मनी
मनूशी देण्या लढा रणी
भिमाची आन घ्या रे
संघर्ष करण्या अन्यायाशी एकीनं या रे ।।धृ।।

नको कुणाची गुलामी ती
नको कुणाची सलामी ती
नको चव्हाट्यावरी आता
इज्जतीची निलामी ती
भिमाची शिकवण आठवूनी
क्रांतीच्या मशाली पेटवूनी
जयभीमचा नारा द्या रे ।।१।।

विषमतेला चीरू इथे

भिमाची समता भरू इथे
भिमाचं कार्य करू इथे
निळ्या झेंड्याखाली तरू इथे
समानतेनं नांदू चला
एकीचा रांधा रांधू चला
एका ठाई एक व्हा रे ।।२।।

अन्याय कोणी साहू नका
लाचार कोणी होऊ नका
मनूवाद्यांना भिऊ नका
मनूला थारा देऊ नका
वाघापरी त्या जीणं जगा
गुलामीचं हे जीणं त्यागा
सैनिकांनो सारे ।।३।।

ईमान भिमाचे राखा तुम्ही
एकीनं फळ ही चाखा तुम्ही
सोडू नका हा मोका तुम्ही
देऊ नका रे धोका तुम्ही
"विजया हर्ष मनोजाला"
सांगणं साऱ्या समाजाला
पुढे पुढे तुम्ही जा रे ।।४।।

।। जात ।।

अजून नाही गेली इथल्या
माणसातली जात
करीत आहे अजून इथल्या
माणूसकीचा घात ।।धृ।।

जात गावात आडवी येते
जात नावात आडवी येते
जात देवात आडवी येते
देवा घेवात आडवी येते
जातीवादी नागीन ऐसी

टाकून गेली कात ।।१।।

जात भक्तात पांगली
जात रक्तात पांगली
जात विषारी वाऱ्यापरी
साऱ्या जगतात पांगली
ह्याच जातीच्या पायी येथे
होतोय रक्तपात ।।२।।

जात जातीला पेरीते
जात जातीला सारीते
जात जातीला घेरीते
जात जातीला मारीते
मानवतेच्या जगात झाली
भयाण काळी रात ।।३।।

या जातीपातामुळं
झाली उजाड कैक कुळं
असं जातीचं वर्तुळ
झालं मानवतेला सुळं
अशा जातीला मारू विजया
लाथावरती लाथ ।।४।।

।। गीत माझे ।।

गायक : विजय काशिद

गीत माझे असावे, दऱ्या डोंगरी
सुर माझे घुमावे, निळ्या अंबरी ।।धृ।।

नवी कल्पना ही, जगावेगळी
नव्या कल्पनेची, खुलते कळी
नवा गोडवा नवा गवगवा हृदयाच्या अंतरी ।।१।।
पालवी मनाला, नवे गीत ते
डोलवी क्षणाला, संगीत ते
झुळझुळ झरा तो सरसरा, बोलावा सुस्वरी ।।२।।

ताल अन् सुरांची, मैफील नवी
कवी कल्पना ती, मना भारवी
विजया नवे गाणे हवे, नित्य या भूवरी ।।३।।

।। प्रबुद्ध देश करा ।।

गायक : रामलिंग जाधव

भिमरायाच्या शूरवीरांनो, क्रांती ऐसी करा
भिमरायाच्या विचारातला, प्रबुद्ध देश करा ।।धृ।।

पंचशिला अन् त्रिशरणाने, व्हावे पवित्र
शुद्ध मनाने, बुद्धाला स्मरा ।।१।।

द्वेष मत्सर जाळून टाका, मानव प्राणी
हिंसा रोका, तरू द्या आणि तरा ।।२।।

सुख शांती, समतेने नांदा
बांधूया समतेचा बांधा, विषमता दूर करा ।।३।।

धम्मध्वज हा, घेऊनी हाती
करू आज शांतीने क्रांती, विजयासंग धरा ।।४।।

।। जातीवाद्याशी लढा ।।

गायक : विजय काशिद

जातीवाद्याशी लढा देताना, भिमाला पाहीले
रणशिंग फुंकताना त्या, भिमाला पाहीले ।।धृ।।

बंधनात रूढीने आम्हाला, बांधले होते
रूढीचे बंध तोडताना, भिमाला पाहीले ।।१।।

गुलामी गाडण्या भिमाने, इथे दंड ठोकले
गुलाम मुक्त सोडताना त्या, भिमाला पाहीले ।।२।।

काळ्या रामाने जरी आम्हा, दूर ठेवीले

वाट धम्माची दावताना त्या, भिमाला पाहीले ।।३।।

जीवन होतं काल आमचं, पशूपरी इथे
लळा मायेनं लावताना त्या, भिमाला पाहीले ।।४।।

।। भिमा तुझी मुलं ।।

भिमा तुझी मुलं दिशाभूल झाली आज
चढलाय माज यांना चढलाय माज ।।धृ।।

निष्ठा धुळीला यांनी मिळवीली सारी
तुझ्या विचारांना हेच झाले घातकारी
शिरावरती चढवीलं बेईमानी ताज ।।१।।

कुणी जातो इकडे तर कुणी जातो तिकडे
भिमा तुझ्या एकतेचे केलेत तुकडे
भलताच इथं करी येऊनी राज ।।२।।

बाजार मांडलाय राजकारणाचा
ध्यास नाही कुणाला या गोरगरीबांचा
जनाची वा मनाची ही उरली ना लाज ।।३।।

पाहून खंत आता मनाला या वाटे
भिमा तुझ्या मागे सारे पुढारी हे खोटे
विजयाच्या गीतातूनी बोलतो समाज ।।४।।

।। मैफील ।।

वामनही दिसेना इथे, लक्ष्मण ही दिसेना इथे
भीमवादी विचाराची, आज मैफील दिसेना इथे ।।धृ।।

वाटते ही सुनी मैफील, सरली सरली जुनी मैफील
मैफीलीला फुलवणारा, आज श्रावण दिसेना इथे ।।१।।

रसिकांना हसवणारा, रसिकांना रडवणारा
बादशहा अभिनयाचा, गोविंद दिसेना इथे ।।२।।

गोड कंठामधूनी इथे, घोळणारा मधाळ गीते
स्वर सम्राट गाण्यातला, प्रल्हाद दिसेना इथे ।।३।।

थांबली रे जणू चळवळ, गीत संगीताची खळखळ
गीत विजया हे क्रांतीचे, गाणारा दिसेना इथे ।।४।।

।। दोष ।।

शोध आधी माणसा
दोष तुझ्यातला
बेहोष सारा झाला
होष तुझ्यातला ।।धृ।।

घेण्याआधी भरारी
उंच नभामध्ये
निरखूनी बघ तू पुन्हा
जोश तुझ्यातला ।।१।।

गर्वाचे घर रिकामे
असते सदा इथे
काढूनी टाक तू सारा
द्वेष तुझ्यातला ।।२।।

संतुष्टी का नाही
तुझ्या या मनाला
जागा तू कर पुन्हा
संतोष तुझ्यातला ।।३।।

विजया तू हा सल्ला
देतो गीतातूनी
निच पणाचा जाळ तू
कोष तुझ्यातला ।।४।।

।। लढा लढवीत जाऊ ।।

गायक : मिलींद निकम

मनूवाद्याला तुडवीत जाऊ रं
बहुजनाला जुडवीत जाऊ
बार क्रांतीचा उडवीत जाऊ रं
लढा हक्काचा लढवीत जाऊ ।।धृ।।

भिम सेना भीमाची सारी
बनवूया ही क्रांतीकारी
क्रांतीकारी हे घडवीत जाऊ ।।१।।

नको नको हा जातीपात
हाच मानवतेचा घात
धडे ज्ञानाचे पढवीत जाऊ ।।२।।

मनी ठेवूया एकच ध्यास
जातीवाद्याचा करू विनाश
चढे विजया चढवीत जाऊ ।।३।।

।। लेखणी भिमाची ।।

गायक : विजय काशिद

लेखणी भिमाची, झाली तलवार इथे
गगन भेदणारी, झाली ललकार इथे ।।धृ।।

भारत देशाची, अखंड शान आहे
दुबळ्या जनतेला, दिलेलं दान आहे
भिमाच्या स्पर्शाने झाली अंगार इथे ।।१।।

लढाई दलितांची, लढण्या खळवळली
तुटून वैऱ्यावर, क्रोधाने सळसळली

सौदामिनीपरी, झाली चमकार इथे ।।२।।

झुंज होती तिची, विषमतेच्यावरी
समता आणली ती, दिल्लीच्या दरबारी
न्याया हक्काची, झाली सरकार इथे ।।३।।

वर्ण जातीला, गाडून टाकिले
मनूच्या सैताना, फाडून फेकिले
विजय होवूनी, झाली साकार इथे ।।४।।

।। वादळाशी झुंजणारा ।।

गायक : रघुनाथ पडवळ

वादळाशी इथे झुंजणारा
एक वारा इथे भीम होता
तिमिरांना इथे प्रकाशणारा
एक तारा इथे भीम होता ।।धृ।।

माय होता इथे लेकरांना
उब होता इथे पाखरांना
कोटी कोटी जिवांचा जिव्हाळा
एक प्यारा इथे भीम होता ।।१।।

मान होता इथे शान होता
ज्ञानाची इथे खाण होता
बुद्ध अमृत इथे पाजणारा
एक धारा इथे भीम होता ।।२।।

सुख होता इथे हित होता
गांजल्यांची इथे जीत होता
त्या मनूला इथे मारणारा
एक मारा इथे भीम होता ।।३।।

सूर होता इथे तान होता
विजयाचे नवे गान होता

तारा हृदयाच्या झणकणारा
एक तारा इथे भीम होता ।।४।।

।। वारावरी करू चला वार ।।

गायक : आनंद शिंदे

वारावरी करू चला वार
मनूवादी करू सारे ठार
घेऊ चला हाती हत्यार (तलवार)
जशास तसा करूया प्रहार ।।धृ।।

खैरलांजीच्या प्रकरणाची
सैतानाच्या कुकर्माची
ऐका भोतमांगेची पुकार ।।१।।

जिथे जिथे शोषण करती
मारू तयांना वेशीवरती
बसू नका आता थंडगार ।।२।।

भिम क्रांतीची होऊ द्या लाट
रक्ताचे ते वाहू द्या पाट
रक्तामधी फुलवा अंगार ।।३।।

घरात आता बसू नका रे
हिजड्यावानी हसू नका रे
विजयाचा हाच निर्धार ।।४।।

।। मानवतेचा शिल्पकार ।।

गायक : आनंद शिंदे

मानवतेचा शिल्पकार या जगामधी ठरला
भिमाने कोटी कोटी काळजात बुद्ध कोरला ।।धृ।।

मानवतेचे जे जे संहारी, दिली भिमाने त्यांना ललकारी
बुद्धीपुढे नमल्या तलवारी, मानवतेचा वैरी

भीमाने वेळीच मारला ।।१।।

बुद्धज्ञानाचे पाजिले नीर, अंधश्रद्ध लोटली दूर
बुद्धचरणाशी नमवीले शीर, विखुरलेला हा समाज
एकतेने हेरला ।।२।।

पाषाणांना फोडूनी वाचा, बुद्ध धम्माचा ठेवूनी साचा
समानतेचा बनविला ढाचा, पंचशिलेचा मंत्र
भिमाने त्यात भरला ।।३।।

निर्मळ जीवनाचा आनंद, मानवतेचा दरवळे गंध
हर्ष जाहला हा बेधुंद, "विजया" तुझ्यापरी विश्वाने
हा धम्म स्विकारला ।।४।।

।। पँथरचे वाघ ।।

गायक : विजय काशिद

भिमसैनिकांनो आता तरी जागं व्हा
डरकाळी फोडा पुन्हा पँथरचे वाघ व्हा
करा संघर्ष करा करा संघर्ष करा ।।धृ।।

होत आहे तोच पुन्हा इथे रक्तपात
माय माऊल्यांची नग्न काढूनी वरात
जातीवादी पेटलाया पुन्हा जागोजाग
दलितांच्या वस्तीला लागलीया आग ।।१।।

विटंबना पुतळ्याची होते रातोरात
पेटवूनी देते कुणी दंगे आपसात
लावूनी देणारे इथे जगतीया बेदाग
निष्पापी मरणारे मरती लावूनिया दाग ।।२।।

अत्याचारावरी रोज होतो अत्याचार
अत्याचाराची ही सीमा झाली आता पार
आता तरी येऊ द्या तुम्हाला याचा राग

जातीवादी ठेचा तुम्ही विषारी काळे नाग ।।३।।

रक्ताच्या नद्या भले आता वाहू द्या
व्हायचे आता तेच होऊ द्या
भीमवीरांनी केला ज्याकरीता येथे त्याग
विजया तुलाही आता तेच करणे भाग ।।४।।

।। भिमगंधार ।।

गायक : विजय काशिद

सप्तस्वरांनी बहरून आला, संगीतमम श्रृंगार
क्रांतीवीरांच्या क्रांतीचा हा क्रांतीमय अंगार
भिमगंधार ऽऽ भिमगंधार ऽऽ भिमगंधार ।।धृ।।

गाण्यामधला राग अनोखा झाला भिमगंधार
मनामनाच्या छेडून जाई तारा भिमगंधार
घुमू लागला चोही दिशेला सुरेल झणझणकार ।।१।।

बुद्ध कबीर शाहू फुल्यांची पेरीत विचारधारा
विचारांनी संघर्ष करण्या होऊन तुफानवारा
अज्ञानाचा दूर लोटण्या काळोखा अंधार ।।२।।

युगपुरूषांची गौरवगाथा, मंगल मधूर वाणी
यावे मरण मज गाता गाता क्रांतीवीरांची गाणी
विजया गाई गीत क्रांतीचे होऊनी झुंजार ।।३।।

।। निळी पहाट ।।

कॅसेट : निळी पहाट गायक : सुधीर कुचेकर

निळ्या सुखात न्हाहली इथे
भीमा तुझ्यामुळे

निळी पहाट जाहली इथे
भीमा तुझ्यामुळे ।।धृ।।

निळ्या नभात निळाई सारी
अखंड भूमीवर निळी स्वारी
निळ्या रंगाने रंगली न्यारी
निळा सुगंध पावली इथे
भीमा तुझ्यामुळे ।।१।।

किलबिल पुन्हा झाली पक्षांची
झुलली फांदी बोधीवृक्षाची
समता वसली नव्या कक्षाची
निळी मिळाली सावली इथे
भीमा तुझ्यामुळे ।।२।।

कणाकणात सुख आले रे
मनामनाचे दु:ख गेले रे
निळ्या सुखात सारे न्हाले रे
निळ्या सुखी सुखावली इथे
भीमा तुझ्यामुळे ।।३।।

निळेच गीत अन् निळेच गाणे
विजया गाई सप्तस्वराने
निळ्या गीताचे चाळूनी पाने
हर्ष अंती भावली इथे
भीमा तुझ्यामुळे ।।४।।

।। बुद्धाचा धम्म ।।

गायक : विजय काशिद

विश्वाला तारणारा बुद्धाचा धम्म आहे
मानवता पेरणारा बुद्धाचा धम्म आहे ।।धृ।।

शोधिले ज्याने दु:खाचे मूळ
उद्धरिले हे मानवाचे कूळ

दु:खाला सारणारा बुद्धाचा धम्म आहे ।।१।।

जात नाही इथे भेद नाही
मानवतेला इथे छेद नाही
समतेला भारणारा बुद्धाचा धम्म आहे ।।२।।

अंधश्रद्धेला नाहीच थारा
विज्ञानाची आहे विचारधारा
सत्याला हेरणारा बुद्धाचा धम्म आहे ।।३।।

सौख्य आहे खऱ्या जीवनाचे
विजयाच्या नव्या कवनाचे
विज्ञान झारणारा बुद्धाचा धम्म आहे ।।४।।

।। नाटक गांधीचे ।।

गायक : आनंद शिंदे

तुमच्याच स्वार्थासाठी गांधी मरू नका
नाटक उपोषणाचे गांधी करू नका ।।धृ।।

समता हवी आहे मला विषमता नको
हट्ट हा वेड्यावानी गांधी करू नका ।।१।।

माझ्या समाजासाठी लढणार मी इथे
वाटेत माझ्या तुम्ही गांधी शिरू नका ।।२।।

बापू तुम्हास सारा म्हणतो अखंड देश
बदनाम तुमचे तुम्ही गांधी ठरू नका ।।३।।

मेलात तुम्ही जर का लागेल मजला डाग
हरण्याआधीच तुम्ही गांधी हरू नका ।।४।।

माझ्या सहीवरी जरी वाचेल तुमचा प्राण
विजयाच्या चिंतनाला गांधी स्मरू नका ।।५।।

।। भीम क्रांतीच्या मशाली पेटवा ।।

नको नको आता लाचार पणं
वाघापरी तुम्ही जगावं जीणं
भीमरायाच्या क्रांतीला आठवा
भीमक्रांतीच्या तुम्ही मशाली पेटवा ।।धृ।।

लढाई तुमची तुम्हीच लढा
वैऱ्याला शिकवा तुम्हीच धडा
मनू नीतीवर सुनामी लाटा व्हा ।।१।।

गटातटाचं तोडा रे पाश
एकीचा यानेच होई विनाश
बेईमानीला वेळीच हटवा ।।२।।

भीमाच्या बोलती पाऊलखुणा
शासनकर्ती जमात बना
निष्ठा भीमाची मनात साठवा ।।३।।

निळ्या झेंड्याच्या साऊलीखाली
साद पुन्हा पहा हर्षाने दिली
संग विजयाच्या आवाज उठवा ।।४।।

।। निर्धार बा भिमाचा ।।

भिमाच्या भीमवीरांनो, एका ठिकाणी या रे
भीम क्रांतीच्या मशाली, एकीनं पेटवा रे ।।धृ।।

निळ्या झेंड्याची राखा रे शान
नका होऊ कुणी बेईमान
रक्त हे स्वाभिमानी विश्वाला दाखवा रे ।।१।।

समता ममता ही नांदावी येथे
भीम विचाराने रांधावी येथे

भीम चळवळीला सारे आधारस्तंभ व्हा रे ।।२।।

नाव घेऊनी मुखी बा भीमाचे
धडे गिरवूया भीम कार्याचे
विजया अन् हर्षाला सर्वांनी साथ द्या रे ।।३।।

।। भाऊ ।।

जगायचं होतं मला, जगायचं होतं
सुख माझ्या पोराचं, बघायचं होतं ।।धृ।।

आयुष्य गेलं सारं, कष्ट करता करता
थोडसं सुख आता, भोगायचं होतं ।।१।।

माझ्या पावलांच्या, पोळलेल्या जखमा
हळुवार वेदनांना, त्यागायचं होतं ।।२।।

मिसळून घरामधी, रहा माझ्या मागं
वचन तुम्हाला हे, मागायचं होतं ।।३।।

डोळ्यापुढं माझ्या जरी, आलं होतं मरण
जिवनाच्या बेरीजीने, भागायचं होतं ।।४।।

माझ्या मृत्यूसमयी, विजयाही नव्हता जवळ
समजावून त्याला काही, सांगायचं होतं ।।५।।

।। तुकड्यावर जगता तुम्ही।।

दुसऱ्याच्या तुकड्यावरती, जगता अजून तुम्ही
जीणं गुलामगिरीचं हे, भोगता अजून तुम्ही ।।धृ।।

गेलीच नाही कारे, अंधभावना मनाची
धम्माची वाट सोडून, वागता अजून तुम्ही ।।१।।

शासनकर्ते व्हारे, हे बोल भीम बाचे आहे
सत्तेची भीक येथे, मागता अजून तुम्ही ।।२।।

नरकामधून तुम्हा, काढिले वर भिमाने
नरकात त्याच पुन्हा, रेंगता अजून तुम्ही ।।३।।

अन्याय होत असता, डोळ्यासमोर तुमच्या
गुपचुप सारं काही, बघता अजून तुम्ही ।।४।।

विजयापरी भीमाला घ्यावे, तुम्ही शिकूनी
बापाचे नाव येथे, डागता अजून तुम्ही ।।५।।

।। बामणवाड्यात शिरतयं।।

भीमाचं पोर शिकलयं फार
शिकून सवरून आलयं म्होरं
याला नाही कुणाची भिती
भीम पौलादी याची छाती
बामणवाड्यात शिरतयं
पोरगं मोबाईल घेऊन फिरतयं ।।धृ।।

शेणाचं टोपलं हातात होतं
पेनाचं तत्व ठाऊक नव्हतं
शाळेमधी आज शिकवण देत
प्रोफेसर झाला आज कॉलेजात
पाहून त्याचा रूबाब आता
मानमनामधी भरतयं ।।१।।

धनावीना होतं लाचार जीणं
होता गुन्हा तवा जमवाया धन
भिमरायाच्या पुण्याईनं
बँकेत आज हाय चेयरमेन
माडीत ऱ्हातय गाडीनं जातयं
बिजनेस मोठा करतयं ।।२।।

निराधार होतं जे कालवर
लोकांना झालं तेच आधार
आमदार झाला अन् खासदार
पोलीसात झालं कमिशनर
मुख्यमंत्री होऊन आता
जोमानी काम करतयं ।।३।।

भिमामुळं सारं सार्थक झालं
शिकून मोठ्या पदाला गेलं
काम त्यानं असं जिद्दीनं केलं
म्हणूनी आजला सुखात न्हालं
विजयावाणी ते स्वाभीमानी
लोकामधी आज ठरतयं ।।४।।

।। भीमरणात लढ ।।

भीमरणात एकलाच लढ रं
त्याला अन्यायाची लय चीडं ।।धृ।।

बालपणाची आठवण जुनी
त्यानं ठेऊन आपल्या मनी
देशविदेशात जाऊनी
आला शिक्षण तो घेऊनी
ज्ञानबळाने लढला पुढं रं ।।१।।
नको गुलामीचं हे जीणं
तिथं नाही कशाची जाणं
ज्यात नाहीच माणुसपणं
अशा जिण्यात नाही मानं
नको जीणं असं भेकडं रं ।।२।।

पाणी जनावरानं प्यावं
आम्ही पाण्याविना तरसावं
कुण्या देवाला आली ना किव
आमचा पाहून व्याकूळ जीव

जवा हालवील ते महाडं रं ।।३।।

साऱ्या शुरामधी शुरवीर
असा झाला खरा रणवीर
हर्ष विजया जीवनभर
गाई कवन हे जगभर
सारी झाडली मनूची किडं ।।४।।

।। भीमतारा ।।

कॅसेट : राखा भीमाचे इमान गायक : सुदर्शन

तारांगणाचा भीम तारा, तुटला तो भीम तारा
लोपून आज गेला, आम्हा प्रकाशणारा ।।धृ।।

सहा डिसेंबरचे, निर्वाण बा भीमाचे
उरलेच नाही कोणी, आम्हास तारणारा ।।१।।

वादळ क्षणात आलं, वादळ क्षणात गेलं
त्या क्षणभरच्या वादळाने, केला असा मारा ।।२।।

आले असे उधाण, झाले उजाड रान
फुलविल कोण आता, पुन्हा अशा शिवारा ।।३।।

विजया ही भीमवाणी, भिजली रे आसवांनी
पुसण्यास कोण येईल, नयनांमधील धारा ।।४।।

समाप्त

आमच्या प्रकाशनाची पुस्तके भारतात कोठेही पोस्टाने घरपोच मागवा; आताच संपर्क करा.
मोबाईल नं. ९९६९१९८८२१